व्हीएसपीएम. ॲकेडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपूर

**जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी नागपूर**

# अहवाल

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम

## सत्र – 2024 – 25

# अनुक्रमणिका

| अ. क्र. | तपशिल | विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|
| 1 | योग दिन | 45 | 21 जून 2024 |
| 2 | वाहतुक नियम व सुरक्षा | 68 | 24 जुलै 2024 |
| 3 | हर घर तिरंगा | 67 | 09 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2024 |
| 4 | निःशुल्क महाआरोग्य व रूग्णभरती शिबीर | 100 | 08 सप्टेंबर 2024 |
| 5 | वृक्षारोपन | 25 | 10 सप्टेंबर 2024 |
| 6 | विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार | 01 | 24 सप्टेंबर 2024 |
| 7 | राष्ट्रीय सेवा योजना दिन | 78 | 24 सप्टेंबर 2024 |
| 8 | स्वच्छता ही सेवा कार्यक्रम | 50 | 02 ऑक्टोंबर 2024 |
| 9 | महात्मा गांधी जयंती स्वच्छता ही सेवा | 55 | 02 ऑक्टोंबर 2024 |
| 10 | मतदार जनजागृती कार्यशाळा | 03 | 07 ऑक्टोंबर 2024 |
| 11 | मतदार जनजागृती | 70 | 26 ऑक्टोंबर 2024 |
| 12 | संविधान दिवस | 50 | 26 नोव्हेंबर 2024 |
| 13 | जागतिक एड्स सप्ताहानिमित्त निबंध स्पर्धा | 30 | 03. डिसेंबर 2024 |
| 14 | वाचन संकल्प महाराष्ट्राचा | 153 | 01 ते 15 जानेवारी 2024 |

VSPM Academy of Higher Education Nagpur's
Jawaharlal Nehru Arts, Commerce and Science College, Wadi, Nagpur- 440023 (M.S.)
(Affiliated to RTM Nagpur University, Nagpur)
Website: www.jncwadi.ac.in E-mail: jnc.wadi@rediffmail.com Phone: (07104) 220963

# योग दिन अहवाल

दिनांक 21.06.2024 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सारंग खडसे यांनी प्राणायम, कपालभारती, अनुलोमविलोम भ्रस्तीका, इत्यादी योगाची उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योगाचे धडे दिले सोबतच योगाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे प्रामुख्याने उपस्थित होते.




GPS Map Camera
Google
Hingna, Maharashtra, India
Block C, 102, Wadi, Hingna, Nagpur, Maharashtra 440021, India
Lat 21.150595°
Long 79.005622°
21/06/24 09:04 AM GMT +05:30

# वाहतुक नियम व सुरक्षा कार्यक्रम अहवाल

दिनांक 24.07.2024 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वाहतुक नियम व सुरक्षा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे होते. तर प्रमुख अतिथी पी. आय. मा. प्रशांत धांडे व ए.पी. आय. मा. विजय धुमाळ होते. याप्रसंगी मा. विजय धुमाळ यांनी वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे अपघाताचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. यात मोठया प्रमाणात युवकांचा बळी जातो. व तरूणाच्या मृत्यूने त्या कुटुंबावर मोठा आघात होतो. वाहतुकीचे नियम पाळल्यास अपघात टाळता येईल असे मत व्यक्त केले. यासोबतच त्यांनी चित्रफितीच्या माध्यमातून लहान. लहान चुकांमुळे कशाप्रकारे अपघात होतात हे सुध्दा दाखविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सारंग खडसे यांनी केले. तर डॉ. काशिनाथ मानमोडे यांनी मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व 60 विद्यार्थी उपस्थित होते.



VSPM Academy of Higher Education Nagpur's
Jawaharlal Nehru Arts, Commerce and Science College, Wadi, Nagpur- 440023 (M.S.)
(Affiliated to RTM Nagpur University, Nagpur)
Website: www.jncwadi.ac.in E-mail: jnc.wadi@rediffmail.com Phone: (07104) 220963

# हर घर तिरंगा उपक्रम अहवाल

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सहसंचालक नागपूर यांचे दिनांक 12.08. 2024 पत्र क्र.उशिनाग/आस्था/संकीर्ण 4173/2024 नुसार भारतीय स्वातंत्र्याला 77 वर्ष पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत राहाव्यात स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञातनायक, क्रांतीकारक तसेच स्वातंत्र्यसंग्रात घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे म्हणून हर घर तिरंगा म्हणजे घरोघरी तिरंगा कार्यक्रमाची अमंलबजावणी महाविद्यालयातर्फे करण्यात दि. 09.08.2024 ते 15.08.2024 या दरम्यान महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

## 1. तिरंगा यात्रा

दिनांक 9. ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 10.00 ते 11.00 या दरम्यान जनमानसात तिरंग्याविषयी अभिमान व राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी तिरंगा यात्रा काढण्यात आली. याप्रसंगी 120 विद्यार्थी यात सहभागी होते. तसेच महाविद्यालयातील एन.एस.एस, एन.सी.सी. पथक यांच्या नेतृत्वात यात्रा काढण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सहभागी होते



# निःशुल्क महाआरोग्य व रूग्णभरती शिबीर

दिनांक 8.09.2024 रोजी लता मंगेशकर हॉस्पीटल डिगडोह, नागपूर यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, आंबेडकर नगर वाडी येथे निःशुल्क महाआरोग्य व रूग्णभरती शिबीर घेण्यात आले. शिबीरात ब्लडप्रेशर, ब्लड शुगर ईसीजी व औषध वितरण करण्यात आले. बालकांपासून ते वृध्दापर्यंत 1000 महिला व पुरूषांनी या शिबीरात विविध विभागातील डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली. 300 गरजू रूग्णांना उपचारासाठी लता मंगेशकर रूग्णालयात भरती करण्यात आले. शिबीरात ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी उपस्थित रूग्णंना संबोधित करतांना शिबीराचे आयोजक व लता मंगेशकर रूग्णांलयाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. आशिष देशमुख यांनी वाडी येथील रूग्ण मोठया प्रमाणात लता मंगेशकर रूग्णालयात विश्वासाने उपचारासाठी येत असल्याने या भागातील गरजू रूग्णांना सामाजिक भावनेतून निःशुल्क उपचार मिळावेत हा या शिबीराचा उद्देश असून अत्याधुनिक उपचार सेवा रूग्णांना प्रदान करण्यास आम्ही कटिबध्द आहोत असे सांगितले. यावेळी वाडी नगरपरीषदेचे मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा यांनी परिसरातील सर्व नागरीकांनी या शिबीरात तपासणी करून शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सारंग खडसे यांनी उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योगाचे धडे दिले सोबतच योगाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे प्रामुख्याने उपस्थित होते.




GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
177, Amravati Rd, Wadi, Nagpur, Maharashtra 440023, India
Lat 21.153248°
Long 79.009035°
08/09/24 10:13 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
177, Amravati Rd, Wadi, Nagpur, Maharashtra 440023, India
Lat 21.153251°
Long 79.009111°
08/09/24 10:12 AM GMT +05:30
Google

सकाळ वृत्तसेवा

# एक हजार रूग्णांनी घेतला शिबिराचा लाभ

**सकाळ वृत्तसेवा**

वाडी, ता.१२: लता मंगेशकर रुग्णालय डिगडोह, हिंगणाच्या वतीने वाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती परिसरात महाआरोग्य तथा रुग्णभरती शिबिर पार पडले.

शिबिरात निःशुल्क ब्लड प्रेशर, ब्लड शुगर, ईसीजी, औषध वितरण करण्यात आले. बालकांपासून तर वृद्धांपर्यंत १००० महिला व पुरुषांनी या शिबिरात विविध विभागातील डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली. ३०० गरजू रुग्णांना निःशुल्क उपचारासाठी लता मंगेशकर रुग्णालय हिंगणा रोड येथे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. शिबिरात ऐच्छिक रक्तदानही करण्यात आले. यावेळी उपस्थित रुग्णांना संबोधित करताना शिबिराचे आयोजक व लता मंगेशकर रुग्णालयाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. आशिष देशमुख यांनी या भागातील गरजू रुग्णांना सामाजिक भावनेतून निःशुल्क उपचार मिळावेत हा या शिबिराचा उद्देश असून अत्याधुनिक उपचार सेवा रुग्णांना प्रदान करण्यास आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले. शिबिरातून 'रेफर' केलेले रुग्ण कोणत्याही विभागातील जनरल वार्डमध्ये भरती झाल्यास त्यांना बेड चार्जेस, नर्सिंग चार्जेस व डॉक्टर चार्जेस लागणार नाहीत. त्यांचे सर्व प्रकारचे ऑपरेशन व उपचार पूर्णतः निःशुल्क करण्यात येतील. सर्व रुग्णांची रक्ताची तपासणी, एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स-रे व इतर सर्व निदान चाचण्या निःशुल्क तसेच औषधी निःशुल्क देण्यात येईल. यासह लता मंगेशकर मातृत्व योजनेअंतर्गत गर्भवती महिलांची निःशुल्क नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन डिलिव्हरी करण्यात येईल. तसेच गर्भवती महिलांना ओपीडीपासून डिलिव्हरी होईपर्यंत तपासण्या व औषधी निःशुल्क उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. उद्घाटनास वाडी न.प.चे मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख, प्रेम झाडे, नरेश चरडे, दिनेश बन्सोड, संतोष नरवाडे, प्रा.सुरेंद्र मोरे, सुजित नितनवरे,शैलेश थोराणे, आनंद कदम, सरिता यादव, राकेश मिश्रा, राजेश जंगले, योगेश चरडे, अखिलेश सिंग, समितीचे सचिव प्रकाश गजभिये, वाडी न.प. चे स्वच्छता ब्रँड अँबेसिडर नरेश कुमार चव्हाण,भाऊसाहेब भोगे, डॉ. संजय टेकाडे, डॉ.शैलेश चालखोर, सुधीर देशमुख, डॉ.सुश्रुत फुलारे व लता मंगेशकर रुग्णालयाचे सर्व विभाग प्रमुख व डॉक्टर्स यावेळी उपस्थित होते. आयोजनसाठी विनोद बेहेरे, सतीश जंगले, ईश्वर उके, प्रभाकर धोंगडे इत्यादींनी परिश्रम घेतले. संचालन डॉ. अनिरुद्ध देवके यांनी तर डॉ. नितीन देवस्थळे यांनी सर्वांचे आभार मानले.



**वाडी :** लता मंगेशकर रुग्णालय डिगडोह येथील महाआरोग्य शिबिरास भेट देताना डॉ.आशिष देशमुख व डॉक्टरांची चमू.

बातमीदार विजय वानखेडे

# वृक्षारोपन

दिनांक 10.09.2024 रोजी नगरपरीषद वाडी, राष्ट्रीय सेवा योजना व नेचर ग्रीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण 2024 अंतर्गत माझी वसुंधरा 0.5 अभियान राबविण्यात आले. या निमित्ताने वृक्षारोपन करण्याचा संदेश देण्यात आला. मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपन व संवर्धनाशिवाय पर्याय नसल्याचे मत मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांनी व्यक्त केले. माझी वसुंधरा अभियानांतर्गत नगरपरीषदेच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या दर्शनी भागात वृक्षारोपन करण्यात आले. वड, पिंपळ, कडूनिंब इत्यादी 20 वृक्षांचे रोपन करण्यात आले. वृक्षारोपन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएसपीएम. अकॅडेमी ऑफ हायर एज्युकेशनचे कार्यवाह मा. युवराजजी चालखोर, प्रमुख पाहुणे मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, आयक्युएसी समन्वयक डॉ. नरेंद्र घारड व मुख्याध्यापक सचिन डेहनकर उपस्थित होते. दरम्यान युवराजजी चालखोर यांचे हस्ते मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे यांनी केले. तर नेचर ग्रीन क्लबचे सदस्य डॉ. अविनाश इंगोले यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. नितीन कोंगरे, डॉ. मनिषा भातकुलकर, डॉ. लिना फाटे, डॉ. अर्चना देशमुख व 50 विद्यार्थी उपस्थित होते.



तरुण भारत
Apla Nagpur | 2024-09-13 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# नेहरू महाविद्यालय व नगर परिषद वाडी यांचा स्तुत्य उपक्रम

## वृक्षसंवर्धनाला पर्याय नाही

प्रतिनिधी अरूण कराळे



**वाडी :** पर्यावरण समतोल व वसुंधरेसह भविष्यातील मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपणासह संवर्धन करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन वाडी नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांनी केले. येथील जवाहरलाल नेहरू महाविद्यालय व वाडी नगर परिषद यांच्या संयुक्त वतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत माझी वसुंधरा ०.५ अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएसपीएमचे सचिव युवराज चालखोर, तर प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, ग्रीन नेचर क्लबचे समन्वयक डॉ. अविनाश इंगोले, एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ. काशीनाथ मानमोडे, डॉ. नरेंद्र घारड, मुख्याध्यापक सचिन डेहनकर प्रामुख्याने उपस्थित होते.

लावलेल्या झाडांचे जतन करण्याची जबाबदारी महाविद्यालय घेणार असल्याचे युवराज चालखोर यांनी सांगितले. संचालन डॉ. काशीनाथ मानमोडे यांनी, आभार अविनाश इंगोले यांनी मानले. यावेळी स्वच्छता निरीक्षक मुकेश महातो, शहर समन्वयक आशीष गुंडुकवार, नरेशकुमार चव्हाण, हर्ष कापसे, राधेश्याम गिन्हे, सतीश जंगले, आदर्श तवर उपस्थित होते.

Powered by iDocuments

देशोन्नती

( दिलीप तराळेकर )

# वृक्षारोपण, संवर्धनाशिवाय पर्याय नाहीच!

देशोन्नती वृत्तसंकलन

**वाडी :** पर्यावरण समतोल व वसुंधरेसह भविष्यातील मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपणासह त्याचे संवर्धन करण्याशिवाय अन्य पर्यायच नाहीत, असे प्रतिपादन न. प. मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांनी केले. जवाहरलाल नेहरु महाविद्यालय वाडी व नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत माझी वसुंधरा ०.५ अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख



वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएसपीएमचे सचिव प्रा. युवराज चालखोर होते. प्रमुख पाहुणे म्हणून वाडी नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख, प्राचार्य संजय टेकाडे, ग्रीन नेचर क्लबचे समन्वयक डॉ. अविनाश इंगोले, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. काशीनाथ मानमोडे, डॉ. नरेंद्रघारड, मुख्याध्यापक सचिन डेहनकर मंचकावर प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व प्रथम संस्थेचे सचिव प्रा. युवराज चालखोर यांच्या हस्ते मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांचा शाल, श्रीफळ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना विध्यार्थ्यांना पर्यावरण सुरक्षेसाठी वृक्षारोपण व संवर्धनाचे महत्व पटवून सांगतांना पुढील पिढीचे जीवन सुखद करण्यासाठी आपल्याकडे वृक्षारोपण व संवर्धन करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात युवराज चालखोर यांनी लावलेल्या झाडांचे जतन करण्याची जबाबदारी महाविद्यालय घेणार असल्याचे सांगितले. संचालन डॉ. काशिनाथ मानमोडे यांनी तर आभार अविनाश इंगोले यांनी मानले.

वृक्षारोपणाला नगर परिषदेचे स्वच्छता ब्रॅण्ड एम्बेसिडर नरेशकुमार चव्हाण, स्वच्छता निरीक्षक मुकेश महातो, हर्ष कापसे, शहर समन्वक आशिष गुंडूकवार, राधेश्याम गिन्हे, सतीश जंगले, गोदरेज फिड बॅक फाउंडेशनचे आदर्श तवर उपस्थित होते. सामूहिक राष्ट्रगीत गायनाने समारोपी करण्यात आला.

Nagpur Edition Edition
Sep 13, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

VSPM Academy of Higher Education Nagpur's

**Jawaharlal Nehru Arts, Commerce and Science College, Wadi, Nagpur- 440023 (M.S.)**

(Affiliated to RTM Nagpur University, Nagpur)

Website: www.jncwadi.ac.in E-mail: jnc.wadi@rediffmail.com Phone: (07104) 220963

# विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार

महाविद्यालयातील कु. ज्योती पटले या विद्यार्थीनीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने उत्कृष्ट स्वयंसेविका म्हणून दिनांक 24.09.2024 ला मा. प्र. कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी रासेयो. चे संचालक मा. डॉ. सोपानदेव पिसे व्यासपीठावर उपस्थित होते. कु. ज्योती पटले यांनी महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या शिबिरात सक्रिय सहभाग घेतला तसेच दोन महविद्यालय स्तरीय व एक विद्यापीठस्तरीय शिबिरात शिबिरात सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ज्योती पटले हिने जल व्यवस्थापन, आरोग्य शिबिर, अंधश्रध्दा निर्मुलन, प्रौढ शिक्षण, मतदार जाणिव जागृती करण्यासाठी पथनाटय व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून केली. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. रणजितबाबू देशमुख, संस्थापक मा. भाऊसाहेब भोगे, कार्यवाह युवराजजी चालखोर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, डॉ. नितिन कोंगरे, डॉ. नरेंद्र घारड, डॉ. लिना फाटे, डॉ. अर्चना देशमुख व डॉ. अविनाश इंगोले यांनी अभिनंदन केले.

प्रतिनिधी अरुण कराळे शुक्रवार ■ दि. २७ सप्टेंबर २०२४ ३

## ज्योती पटले हिला रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनी ज्योती पटले हिला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दिला जाणारा रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. प्रशांत बोखारे यांच्या अध्यक्षतेत आयोजित विद्यापीठ पुरस्कार वितरण सोहळ्यात दीक्षांत सभागृहामध्ये प्रदान करण्यात आला. ज्योती पटले ही बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी असून तीने मागील दोन वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत सर्व उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ज्योती पटले हिने जल व्यवस्थापन, ग्राम स्वच्छता, आरोग्य शिबीर, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रौढ शिक्षण, मतदार जाणीव जागृती करण्यासाठी पटनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम व नेचर ग्रीन क्लबच्याद्वारे घेण्यात आलेले वृक्षारोपणाचे कार्यक्रम या माध्यमातून भरीव असे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य केले. खडगाव येथे घेण्यात आलेल्या दोन महाविद्यालयीन व एक विद्यापीठ स्तरीय शिबिरात सुद्धा तिने सक्रिय सहभाग नोंदविला. या तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रणजीतबाबू देशमुख, संस्थेचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब भोगे, कार्यवाह युवराज चालखोर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांनी अभिनंदन केले व तिला भावी जीवनाकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे, डॉ. नितीन कोंगरे, डॉ. नरेंद्र घारड, डॉ. लीना फाटे, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. कल्पना बोरकर, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. अविनाश इंगोले व डॉ. मनीषा भातकुलकर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा विद्यार्थिनी ज्योती पटले हिचे कौतुक व अभिनंदन केले.

# NAGPUR POST

*Reporter Arun Karale*

# Jyoti Patle wins university award




Wadi 26 September: Jyoti Patle, a student of Jawaharlal Nehru College of Arts, Commerce and Science here, was awarded the National Service Scheme Department of Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Outstanding Volunteer Award. Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Vice Chancellor Dr Prashant Bokhare presided over the award distribution ceremony in the Convocation Hall. Jyoti Patle is a BA student. She is a third year student and has been a programme officer in the National Service Scheme Department for the past two years. She has actively participated in all the activities under the National Service Scheme under the guidance of Kashinath Manmode.

Through the National Service Scheme, Jyoti Patle has carried out substantial work for the National Service Scheme through water management, village sanitation, health camps, elimination of superstitions, adult education, skits to raise voter awareness, cultural programmes and tree plantation programs conducted by the Nature Green Club. She has also actively participated in two college and one university level camps held at Khadgaon. Regarding her success, the president of the organisation Ranjit Deshmukh, the founder of the organisation Dr. Bhausaheb Bhoge, Yuvraj Chalkhor, Principal of the college Dr. Sanjay Tekade congratulated her and wished her all the best for her future life. Programme Officer Dr. Kashinath Manmode, Dr. Nitin Kongre, Dr. Narendra Gharad, Dr. Leena Fate, Dr. Archana Deshmukh, Dr. Kalpana Borkar, Green Club Coordinator Dr. Avinash Ingole and Dr. Manisha Bhatkulkar, all the faculty members and non-teaching staff of the college also appreciated and congratulated Jyoti Patle for her efforts.

# स्वच्छता ही सेवा कार्यक्रम

राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने स्वच्छता ही सेवा या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालय परीसरात स्वच्छता करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी झाडांना आळे केले तसेच झाडांना पाणी देण्याचे काम केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला







# राष्ट्रीय सेवा योजना दिन

दिनांक 24.09.2024 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आयक्यूएसी समन्वयक डॉ. नरेंद्र घारड व डॉ. नितीन कोंगरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश, ध्येय, ब्रिदवाक्य व या सत्रात राबविण्यात येणारे उपक्रम याबद्दल माहीती दिली. याप्रसंगी डॉ. नितीन कोंगरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासासाठी रचनात्मक कार्य करणे गरजेचे आहे. समाजसेवा निस्वार्थ भावनेने केल्यास आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास होते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. अविनाश इंगोले यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व 80 उपस्थित होते.




जवाहरलाल नेहरु कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय
NOT ME
BUT YOU
NATURE GREEN CLUB
GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
5224+85R, Kachimet, Nagpur, Maharashtra 440023, India
Lat 21.150872°
Long 79.005556°
02/10/24 10:46 AM GMT +05:30
Google

## महात्मा गांधी जयंती

## स्वच्छता ही सेवा

दिनांक 2 ऑक्टोबर 2024 महाविद्यालयात राष्ट्रपीता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे होते. त्यांनी राष्ट्रपीता महात्मा गांधीजींच्या विचसाराची समाजाला खरी गरज आहे परंतु आज समाजात या गोष्टी दिसत नाही. तरूण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे असे विचार व्यक्त केले. तर प्रमुख अतिथी डॉ. नितीन कोंगरे, डॉ. नरेंद्र घारड, डॉ. गजानन झाडे उपस्थित होते. याप्रसंगी महात्मा गांधींची बुनियादी शिक्षण पध्दती आजच्या स्थितीत किती आवश्यक आहे. हे डॉ. कोंगरे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. मानमोडे यांनी केले. त्यांनी महात्मा गांधी एक व्यक्ती नसुन एक विचार आहे. महात्मा गांधीनी सत्य अहिंसा व सत्याग्रह हा मंत्र जगाला दिला. या आदर्श जगातील अनेक समाजसुधारकांनी घेऊन आपल्या देशात या बाबी राबविल्या. नेल्सन मंडेला यांनी याच माध्यमातून निग्रोसाठी लढा दिला व त्यांना न्याय मिळवून दिला असे विचार व्यक्त केले. सुत्रसंचालन डॉ. अविनाश इंगोले यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर महाविद्यालय परीसरात स्वच्छता करण्यात आली



# मतदार जनजागृती कार्यशाळा


दिनांक 07.10.2024 रोजी मतदार जनजागृती करण्यासाठी हिंगणा तहसिल कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत महाविद्यालयातील दिपक रावत, योगेश लोहकरे व कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे सहभागी झाले. या कार्यशाळेत महाविद्यालयाच्या परीसरात वेगवेगळया उपक्रमाव्दारे मतदार जनजागृती करावी असे प्रशिक्षण देण्यात आले.




# मतदार जनजागृती

मा. सहसंचालक (उच्च शिक्षण ) नागपूर विभाग यांचे पत्र क्रमांक उशिनाग/कार्यासन–नागपूर /सर्व महा./5363/ दिनांक 21.10.2024 अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मतदान जागृती अभियान 2024 अंतर्गत नागपूर शहरी मतदान केंद्रात मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता महाविद्यालयात SVEEP उपक्रमाची अमंलबजावणी करण्यात आली. दिनांक 25.10. 2024 रोजी मतदार जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयाजवळील आंबेडकर नगरात रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाटयाच्या माध्यमातून लोकांना मतदानाचे महत्व समजावून सांगितले. रॅलीत 105 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक 26.10. 2024 रोजी महाविद्यालयात मतदान जागृतीसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच पोस्टर स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आली. या दोन्ही स्पर्धेत 70 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सेल्फी पाईट तयार करण्यात येवून मतदान जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी सेल्फी घेतल्या. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे, डॉ. नितिन कोंगरे, डॉ. नरेंद्र घारड, डॉ. लिना फाटे, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. अविनाश इंगोले, प्रा. शितल बोंडे, डॉ. सारंग खडसे डॉ. काशिनाथ मानमोडे प्रामुख्याने उपस्थित होते.




VOTE FOR BETTER INDIA
PLEASE VOTE
VOTE INDIA
नागपुर, महाराष्ट्र, भारत
5224+656, कचिमेट, नागपुर, महाराष्ट्र 440023,
Lat 21.150664° Long 79.005492°
26/10/24 11:00 AM GMT +05:30


राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
व्हि.एस.पी.एम. ॲकेडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर द्वारा संचालित
जवाहरलाल नेहरु
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वाडी, नागपूर.
राष्ट्रीय सेवा योजना
मतदार जागृती अभियान - २०२४
(SVEEP)
GPS Map Camer
नागपुर, महाराष्ट्र, भारत
5224+85r, कचिमेट, नागपुर, महाराष्ट्र 440023, भारत
Lat 21.150711° Long 79.005578°
26/10/24 11:21 AM GMT +05:30


REGISTER
एक मत देशासाठी
तुमचे मत
तुमचा अधिकार
मतदार असल्याचा
मला अभिमान आहे


जो प्रलोभन मे
न आए, जागरूक
मतदाता कहलाहे
मताधिकार हा
तुमचा अधिकार आहे
आणि
तुमचे कर्तव्य आहे
1) yogeeta A. Ban
2) Riddhi Chauhan
BSC 1st Year


GPS Map Camera
नागपुर, महाराष्ट्र, भारत
5224+656, कचिमेट, नागपुर, महाराष्ट्र 440023, भारत
Lat 21.150639° Long 79.005542°
26/10/24 11:25 AM GMT +05:30

# संविधान दिवस

दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी महाविद्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नरेंद्र घारड व डॉ. अर्चना देशमुख होते. याप्रसंगी डॉ. संजय टेकाडे यांनी भारतीय संविधानाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मानमोडे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. अविनाश इंगोले यांनी केले.




---

# जागतिक एड्स सप्ताहानिमित्त निबंध स्पर्धा

जागतिक एड्स सप्ताहानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी एड्स जागतिक एक जागतिक समस्या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकुण 30 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेत कु. साक्षी धांडे प्रथम क्रमांक, कु. आकांक्षा रामटेके व्दितीय क्रमांक व कु. राजमिता मुरमाडकर तृतिय क्रमांक प्राप्त केला. त्यांचा मेडल व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.



# वाचन संकल्प महाराष्ट्राचा

मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्रानुसार महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम दिनांक 01 जानेवारी 2025 ते 15 जानेवारी 2025 या कालावधीत महाविद्यालयात राबविण्यात आला. यात सामुहीक वाचन उपक्रमात एकुण 153 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. 107 पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी वाचन केले. यावेळी एकुण 05 लेखक/ साहित्यिकांना आमंत्रित करण्यात आले.सोबतच निबंध स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये सहभागी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देवून गौरव करण्यात आला.






JAWAHARLAL NEHRU
GPS Map Camera
नागपुर, महाराष्ट्र, भारत
5224+557, कचिमेट, नागपुर, महाराष्ट्र 440023, भारत
Lat 21.150488° Long 79.005565°
31/12/24 11:30 AM GMT +05:30
Google